# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

## अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक 12 ]

**दिनांक : 12/2/2019** **वेळ : सकाळी 11.30 वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी २०१९ ची मासिक सभा मंगळवार दि.12/2/2019 रोजी सकाळी 11.30 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सभापती |
| 2. | मा.केशव हनुमंत घोळवे | सदस्य |
| 3. | मा.तुषार रघुनाथ हिंगे | सदस्य |
| 4. | मा.जावेद रमजान शेख | सदस्य |
| 5. | मा. यादव मिनल विशाल | सदस्या |
| 6. | मा.शैलजा अविनाश मोरे | सदस्या |
| 7. | मा.बाबर शर्मिला राजू | सदस्या |
| 8. | मा.अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 9. | मा.कोमल दिपक मेवानी | सदस्या |
| 10. | मा. विजय गोरख शिंदे | सदस्य |
| 11. | मा. बाबू नायर | स्वीकृत सदस्य, [पिंपरी चिंचवड महानगरपालिका] |
| 12. | मा.राजेश पोपट सावंत | स्वीकृत सदस्य |
| 13. | मा.कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |
| 14. | मा.कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय श्रीम. आशादेवी दुरगुडे – मा. क्षेत्रीय अधिकारी, श्री. दिपक सुपेकर – मा. कार्यकारी अभियंता-स्थापत्य, श्री. प्रशात पाटील - मा.कार्यकारी अभियंता, जलनि:स्सारण श्री. आर.के.लटपटे – प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) श्री. सुभाष काळे उपअभियंता (जल:निस्सारण), श्री. चंद्रकांत मुठाळ,उपअभियंता(स्थापत्य), श्री दिपक कुंभार– उपअभियंता(पाणी पुरवठा), श्री मोहन खोंद्रे (उपअभियंता झोनिपु स्थापत्य), श्री जाधव व्ही.के.-(उपअभियंता उदयान स्थापत्य), श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, श्री प्रदिप बंडागळे – लेखाधिकारी, श्रीमती पल्लवी सासे, श्री. पाटील एस.पी., श्री. गिरिश गुठे, श्री मोरे एस.पी., श्री ठुबे विशाल-कनिष्ठ अभियंता, श्री घुले संभाजी-वसुली अधिकारी, श्रीम व्ही.एस. ठोंबरे -उपलेखापाल, इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, अनुराधा गणपत गोरखे यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक १:-** सन्मा.सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दिनांक १२/२/२०१९ चा प्रस्ताव.

**अ. क्र.१.**-प्रभाग क्र.१९ मधील पिंपरी भाजी मार्केट मध्ये असलेली व्यंकटेश मार्केट ही इमारत चार मजली आहे. सदर इमारतीमध्ये पहिल्या व दुस-या मजल्यावर जाण्याकरिता मंडईच्या मध्य् भागातून व इमारतीच्या चौथ्या मजल्यावरुन जाण्या-येण्यास रस्ता आहे. त्यामुळे नवीन येणा-या नागरिकांना त्रासदायक ठरत आहे. म्हणून सध्या वापरात असणारे रात्र निवारा केंद्र याकडे जाण्यास जो रस्ता आहे त्या रस्त्यास जीना जर मोठा करुन त्या रस्त्यास जोडल्यास सर्व नागरिकांना येण्या-जाण्याचा मार्ग मोकळा होईल व अडचणी दूर होतील म्हणून आपण हा जीना जोडून मोठा करावा व पहिल्या मजल्यास जोडून दयावा.

(कृ.मा.प.)

**अ. क्र.२-** प्रभाग क्रमांक १९ कोहिनूर सिंग्रेला व विझडंब सोसायटीकडे जाण्याकरिता नवीन १२ मीटर रस्ता विकसित केला आहे त्या विकसित रस्त्यावर विद्युत खांब व पथदिवे लावणे.

**अ. क्र.३-** प्रभाग क्र.१९ मधील शगुन चौक व वाल्मिकी चौक सुशोभिकरण करण्याच्या जागेवर अतिक्रमण वाढले आहे. सदर अतिक्रमण हटवून त्या ठिकाणी रस्ते खोदून चौकाचे शोभिकरणाचे काम सुरु करणेत यावे जेणेकरुन पुन्हा अतिक्रमण होणार नाही.

**अ. क्र.४-** प्रभाग क्र.१९ मधील सुदर्शननगर व भाटनगर येथील नाला दुरुस्ती करणे व रमाबाई नगर व भाटनगर येथील नाला सफाई करणे.

**विषय क्रमांक २** सन्मा.सदस्या कोमल मेवानी यांचा दिनांक १२/०२/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१९ मधील पिंपरी भाजी मंडईमध्ये ब्रीज खालील भागात स्थापत्य् विभागामार्फत् काही वर्षापूर्वी बांधकाम करुन खोल्या बांधण्यात आल्या होत्या. सध्या त्याचा वापर होत नसून त्या ठिकाणी मंडईमधील नागरिक त्या जागेचा वापर लघुशंकेसाठी करत आहेत त्यामुळे त्या ठिकाणी अत्यंत दुर्गंधी पसरली आहे. आरोग्य विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी घाणीचे साम्राज्य् निर्माण झाले आहे. कृपया सदर ठिकाणी पत्रे लावून जागा बंदिस्त् करणेत यावी.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले.

---

ठराव क्रमांक 62
दिनांक- 12/02/2019
सुचक: मा. मा.शैलजा मोरे

विषय क्रमांक 1
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.मिनल यादव

संदर्भ: सन्मा.सदस्या कोमल मेवानी यांचा दिनांक १२/०२/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

**अ. क्र.१.** प्रभाग क्र.१९ मधील पिंपरी भाजी मार्केट मध्ये असलेली व्यंकटेश मार्केट ही इमारत चार मजली आहे. सदर इमारतीमध्ये पहिल्या व दुस-या मजल्यावर जाण्याकरिता मंडईच्या मध्य् भागातून व इमारतीच्या चौथ्या मजल्यावरुन जाण्या-येण्यास रस्ता आहे. त्यामुळे नवीन येणा-या नागरिकांना त्रासदायक ठरत आहे. म्हणून सध्या वापरात असणारे रात्र निवारा केंद्र याकडे जाण्यास जो रस्ता आहे त्या रस्त्यास जीना जर मोठा करुन त्या रस्त्यास जोडल्यास सर्व नागरिकांना येण्या-जाण्याचा मार्ग मोकळा होईल व अडचणी दूर होतील म्हणून आपण हा जीना जोडून मोठा कराणेस व पहिल्या मजल्यास जोडून देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**अ. क्र.२.**-प्रभाग क्रमांक १९ कोहिनूर सिंग्रेला व विझडंब सोसायटीकडे जाण्याकरिता नवीन १२ मीटर रस्ता विकसित केला आहे त्या विकसित रस्त्यावर विद्युत खांब व पथदिवे लावणेस मान्यता देणेत येत आहे.

**अ. क्र.३.**-प्रभाग क्र.१९ मधील शगुन चौक व वाल्मिकी चौक सुशोभिकरण करण्याच्या जागेवर अतिक्रमण वाढले आहे. सदर अतिक्रमण हटवून त्या ठिकाणी रस्ते खोदून चौकाचे शोभिकरणाचे काम करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**अ. क्र.४**--प्रभाग क्र.१९ मधील सुदर्शननगर व भाटनगर येथील नाला दुरुस्ती करणे व रमाबाई नगर व भाटनगर येथील नाला सफाई करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

---

ठराव क्रमांक 63
दिनांक12/02/2019
सुचक: : मा. मा.शैलजा मोरे

विषय क्रमांक 2
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.मिनल यादव

संदर्भ: सन्मा.सदस्या कोमल मेवानी यांचा दिनांक १२/०२/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१९ मधील पिंपरी भाजी मंडईमध्ये ब्रीज खालील भागात स्थापत्य् विभागामार्फत् काही वर्षापूर्वी बांधकाम करुन खोल्या बांधण्यात आल्या होत्या. सध्या त्याचा वापर होत नसून त्या ठिकाणी मंडईमधील काही नागरिक त्या जागेचा वापर लघुशंकेसाठी करत आहेत त्यामुळे त्या ठिकाणी अत्यंत दुर्गंधी पसरली आहे. आरोग्य विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी घाणीचे साम्राज्य् निर्माण झाले आहे. कृपया सदर ठिकाणी पत्रे लावून जागा बंदिस्त् करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

---

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती- अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ अनुराधा गणपत गोरखे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:- अक्षेका/9/कावि/ 27 /2019 दिनांक:- 25 /02 /2019

(रामकिसन लटपटे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित -----------------------